# सिटीझन्स युनिटी फोरम, पनवेल
# व स्त्रीबळ फाउंडेशन, आयोजित

CITIZENS' UNITY FORUM
CUF
PANVEL



**डॉ. वैशाली साळुंके-धूत**
संचालिका - स्त्रीबळ फाउंडेशन

**समाजातील महिला अत्याचाराच्या वाढलेल्या घटना बघता समस्त महिलावर्गाने स्वसंरक्षणासाठी सक्षम असणे हि काळाची गरज आहे.**



# महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण

**शनिवार दिनांक 5 ऑक्टोबर 2024**

**स्थळ: वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल**

**वेळ: सकाळी 11.00 वा.**

**निशुल्क प्रवेश**

# . शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## शैक्षणिक वर्ष 2024- 25

## " महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण "

**सिटीझन युनिटी फोरम पनवेल व स्त्रीबळ फाउंडेशन तर्फे " महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण "** हा कार्यक्रम शनिवार दिनांक 5 ऑक्टोंबर 2024 रोजी वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह,पनवेल येथे सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आला होता. समाजातील महिला अत्याचारांच्या वाढलेल्या घटना पाहता समस्त महिलावर्गाने स्वसंरक्षणासाठी सक्षम असणे ही काळाची गरज आहे. या कार्यक्रमांमध्ये पनवेल तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालये, तसेच शिक्षक,प्राध्यापक,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.रमा भोसले यांनी पुढाकार घेऊन आम्हाला सहभागी होण्याची संधी दिली. डॉ.नीलिमा मोरे यांच्या मार्गदर्शनाखालील प्रथम वर्षाच्या 12 आणि द्वितीय वर्षाच्या 21 छात्रध्यापिका कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

या कार्यक्रमांमध्ये विविध मान्यवर,शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि प्राध्यापक यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. स्त्रीबळ फाउंडेशनच्या संचालिका डॉ.वैशाली साळुंखे- धूत यांनी प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमात प्रचंड प्रमाणात विद्यार्थिनीची उपस्थिती राहिल्यामुळे नाट्यगृहात बसण्यासाठी जागा कमी पडली. काही विद्यार्थिनींना पायऱ्यावर बसवण्यात आले होते.

दिल्ली येथील बारा वर्षांपूर्वी झालेल्या निर्भया हत्याकांड, पश्चिम बंगाल येथे झालेले अभया प्रकरण व बदलापूर येथील चिमुरडीवर झालेले अत्याचार अशी प्रकरणे अजून घडत आहेत. त्यामुळे प्रत्येक मुलगी, महिला सक्षम झाली पाहिजे म्हणून हे प्रशिक्षण निशुल्क स्वरूपात आयोजित करण्यात आले होते.

त्यामध्ये डॉ. साळुंखे मॅडमने शाळेच्या विद्यार्थिनींना सहभागी करून प्रात्यक्षिक करून दाखवले. आजची स्त्री न घाबरता अशा घटनांना बळी पडू नये यासाठी असे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. अशा रीतीने हे प्रशिक्षण सर्वांसाठी आयोजित करण्यात आले होते.

Edit with WPS Office

# दीप प्रज्वलन







# प्रात्यक्षिक करून दाखवताना







# विद्यार्थी,शिक्षक, प्राध्यापक यांची उपस्थिती







Edit with WPS Office